महाराष्ट्र शासन
**श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर**
जिल्हा न्यायालयासमोर, सिव्हिल चौक, सोलापूर- ४१३ ००३.

Dean- 0217-2749401,402 • Fax- 0217-2310766 • email- deansolapur@gmail.com

जा.क्र.श्रीछशिमसरुसो/भांडार विभाग/1574 /२०२६ दिनांक- 13/02/२०२६

## वार्षिक जाहिर निविदा सुचना

श्री.छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर या रुग्णालयातील कार्यरत बंद असलेले सर्व सीसीटिव्ही जुनेच साहित्य वापरुन चालू करुन देणे व NVR/DVR/Monitar Systems आवश्यकतेनुसार त्या त्या विभागामध्ये स्थलांतर (Shifting) करुन देणे व नव्याने बसविण्यात येणा-या सीसीटिव्ही त्याकरिता लागणारे सुट्टे भाग खरेदी करण्याकरिता नोंदणीकृत पुरवठादार यांच्याकडून सिलबंद जाहिर निविदा मागविण्यात येत आहे.

सदरील निविदाचे कोरे फॉर्म (अटी व शर्तीसह) या रुग्णालयातील मध्यवर्ती भांडार कक्षातून दि.१४/०२/२०२६ ते दि.२८/०२/२०२६ या कालावधीत सुटटीचे दिवस सोडुन सकाळी १०.००० ते दुपारी ०१.०० व दुपारी ०२.३० ते ०५.०० पर्यंत उपलब्ध होतील. सदर निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख दि.२८/०२/२०२६ रोजी दुपारी ५.०० वाजे पर्यंत राहील. विहित मुदतीनंतर आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. सदर सिलबंद निविदा उघडण्याची तारीख निविदा फॉर्म मध्ये नमुद करण्यात आलेली आहे. अट असलेली निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

Saukaral

अधिष्ठाता,
श्री.छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचाररुग्णालय,
सोलापूर

महाराष्ट्र शासन
# श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर
जिल्हा न्यायालयासमोर, सिव्हिल चौक, सोलापूर- ४१३ ००३.

Dean- 0217-2319448 • Fax- 0217-2310766 • email- deansolapur@gmail.com • website-www.vmgmc.edu.in

## या रुग्णालयातील बंद असलेले सर्व सीसीटिव्ही चालू करुण देणे व NVR/DVR/MONITOR SYSTEMS आवश्यतेनुसार त्या त्या विभागाध्ये स्थालंतर करणे व नव्याने बसविण्यात येणारे त्याकरिता लागणारे सुट्टे भाग खरेदी करण्याकरिता जाहिर निविदा फॉर्म

निविदा क्रमांक :- निविदा किंमत - रु. १००/-

१. निविदा धारकाचे नाव व पत्ता :- ------------------------------------------------

२. निविदा सादर करण्याची अंतीम तारीख :- दि.२८/०२/२०२६ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत.

३. तांत्रीक निविदा (पाकिट क्र.१) उघडण्याची तारीख :- दि.०२/०३/२०२६ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत.

४. व्यापारी लिफाफा (पाकिट क्र.२) उघडण्याची तारीख :- पाकिट क्र.१ मधील पात्र पुरवठाधारकास नंतर कळविण्यात येईल.

५. निविदा कालावधी ;- :- आदेश निर्गमित झाल्यापासुन एका वर्षापर्यंत राहील.

| अ.क्रं | वस्तूचे नाव | मागणी | दर रुपये |
|---|---|---|---|
| १. | या रुग्णालयातील विविध विभागातील जुने सी सी टी व्ही कॅमे-यांची पाहणी करुन जुनेच मटेरियल वापरुन सदरील सीसीटीव्ही (One Time) चालू करुन देणे. तसेच बी ब्लॉक येथील NVR/DVR/MONITOR SYSTEMS ही या रुग्णालयातील विविध विभागामध्ये त्या त्या विभागामध्ये स्थालंतर (शिफ्टींग) करुन सर्व सीसीटीव्ही यंत्रणा चालू करुन देणे. | दर चार्जेस (One time) | |
| २. | या रुग्णालयातील विविध विभागातील कार्यरत असणारे सी सी टी व्ही यंत्रणा अचानक बंद पडल्यास आपणांस कॉल केल्यानंतर त्याच दिवशी आपला प्रतिनिधी पाठवून त्या विभागातील सी सी टी व्ही चेक करून चालू करून देणे. | दर प्रति दिवस | |
| ३ | नवीन कॅमरे बसविण्याकरिता लागणारे साहित्यांचे दर | | |
| | CCTV Camera (Indoor) Day/Night IP ४ Megapixel with Audio | दर प्रति नग | |
| | CCTV Camera (Outdoor) Day/Night IP ४ Megapixel with Audio | | |
| | CCTV Camera (Outdoor) Day/Night HD ५ Megapixel with Audio | | |
| | CCTV Camera (Indoor) Day/Night HD ५ Megapixel with Audio | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | PTZ Camera Day/Night IP ४ Megapixel (Rang ५० meter) with Audio | | |
| | Wireless Camera Day/Night IP २ Megapixel, ४ Megapixel (Rang २०-३० meter) | | |
| | DVR ०८ port | | |
| | DVR १६ port | | |
| | DVR ३२ port | | |
| | NVR ०८ port | | |
| | NVR १६ port | | |
| | NVR ३२ port | | |
| | NVR ६४ port | | |
| | HDD ०८ TB | | |
| | HDD ०४ TB | | |
| | HDD १० TB | | |
| | Media Connector | | |
| | POE switch | | |
| | ६ U Walpack | | |
| | Power Supply | | |
| | Splicing | | |
| | OFC Cable | | |
| | ०४ core Cable | | |
| | CCTV Cable | | |
| | CAT ०६ Cable | | |
| | PP Box (४x४) | | |
| | Giving CCTV Footage | | |
| | LED Full HD Screen ४२ Inch | | |

निविदाधारकाची सही व

तारीख:-

संपुर्ण नाव व पत्ता -------------

स्थळ :-

महाराष्ट्र शासन
श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर
जिल्हा न्यायालयासमोर, सिव्हिल चौक, सोलापूर- 413 003.
Dean- 0217-2319448●Fax- 0217-2310766●email- deansolapur@gmail.com ● website- www.vmgmc.edu.in

भांडार विभाग,श्री छशिमसरुसो                                             दिनांक-13/02/2026

# या रुग्णालयातील बंद असलेले सर्व सीसीटिव्ही चालू करुण देणे व NVR/DVR/MONITOR SYSTEMS आवश्यतेनुसार त्या त्या विभागाध्ये स्थालंतर करणे व नव्याने बसविण्यात येणारे त्याकरिता लागणारे सुट्टे भाग खरेदी करण्याकरिता जाहिर निविदा मागविण्याबाबतच्या अटी व शर्ती

अत्यावश्यक कागदपत्रे-

अ) **तांत्रिक निविदेचा लिफाफा** :- (अ.क्र.१ या लिफाप्यावर तांत्रिक लिफाफा असा स्पष्ट उल्लेख करावा)

१. निविदाधारकाने, दुकाने/व्यावसाय नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्रात व्यवसायाच्या स्वरुपात सीसीटीव्हीचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

२. निविदाधारकास दुस-या शासकीय यंत्रणेतील सीसीटीव्ही बाबत काम करत असल्याचे प्रमाणपत्र निविदा फॉर्म सोबत जोडण्यात यावे.

३. निविदाधारकाने सन २०२३-२४ व २०२४-२५ या वित्तीय वर्षाचे व्यवसाय/आयकर कर भरल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

४. निविदाधारक यांचे जी एस टी प्रमाणपत्र, उद्यम प्रमाणपत्र, आधार कार्ड व पॅन कार्डची प्रत जोडणे आवश्यक आहे.

५. काळया यादीत नाव समाविष्ट नसल्याबाबतचे रु. ५०० च्या स्टॅम्प पेपरवर स्वघोषणापत्र सादर करणे.

६. निविदेसोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्राच्या व नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रती स्वसांक्षकित केलेल्या असल्या पाहीजेत.

**महत्वाचे- अट क्रं. १ ते ६ मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रापैकी एक जरी दस्तऐवज उपलब्ध् नसल्यास निविदा अग्राहय समजण्यात येऊन निविदेचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येणार नाही.**

**ब) व्यापारी लिफाफा क्रमांक-२** (दरासंबंधी - या भरलेले निवीदा दर जोडावे व व्यापारी लिफाफा अथवा दरासंबंधी लिफाफा असे स्पष्ट उल्लेख करावे)

१. या लिफाफ्यामध्ये निविदाधारकाने रक्कम भरुन स्वत: सही करुन विहीत नमुन्यातील निविदा फॉर्मवर स्वीकृत दराच्या ठिकाणी रक्कम सर्व करासहित लिहावी.

२. वर नमुद केलेले लिफाफे (१ व २) स्वतंत्रपणे मोहोरबंद करुन त्यावर तांत्रिक निविदेचा लिफाफा व व्यापारी किंवा दरासंबंधी चा लिफाफा असा स्पष्ट उल्लेख करावा. तसेच हे दोन लिफाफे एका मोठया पाकीटात घालून मोठया पाकीटावर **या रुग्णालयातील सीसीटीव्ही यंत्रणा बाबतचे दर** निविदा असा उल्लेख करावा.

**इतर अटी व शर्ती-**

१. या रुग्णालयातील विविध विभागातील जुने सी सी टी व्ही कॅमे-यांची पाहणी करुन जुनेच मटेरियल वापरुन सदरील सीसीटीव्ही (One Time) चालू करुन देणे. (जीएसटीसह)

२. या रुग्णालयातील विविध विभागातील कार्यरत असणारे सी सी टी व्ही यंत्रणा अचानक बंद पडल्यास आपणांस कॉल केल्यानंतर त्याच दिवशी आपला प्रतिनिधी पाठवून त्या विभागातील सी सी टी व्ही चेक करून चालू करून देणे.

३. या रुग्णालयातील सर्व सी सी टी व्ही बाबत आवश्यकतेनुसार अहवाल मा.वैद्यकीय अधिक्षक किंवा त्या त्या विभागातील प्रमुख यांना देणे बंधनकारक राहील.

४. या रुग्णालयतील सर्व कार्यरत सी सी टी व्ही कॅमे-यांचे आपल्या प्रतिनिधीकडून तपासणी चालू/बंद अहवाल दर सात दिवसाला संबंधीत विभागास देणे आवश्यक आहे.

५. काम करण्यापुर्वी संबंधीत विभागप्रमुख यांना सदरील कामाचे अंदाजपत्रक देणे आवश्यक आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.अधिष्ठाता यांची मंजूरी घेऊन अधिष्ठाता कार्यालयाचे कार्यालयीन आदेश मिळाल्यानंतर काम करावे.

६. नव्याने बसविण्यात येणा-या सी सी टी व्ही कॅमे-यांचे माहिती संबंधीत विभागास देणे आवश्यक आहे.

७. काम पुर्ण झाल्याने संबंधीत विभागाकडून देयके प्रमाणित करुनच या कार्यालयास सादर करावीत.

८. देयका वर जी एस टी क्रमांक असणे अत्यंत आवश्यक आहे.

९. सदरील काम झाल्यानंतर प्रलंबित देयकासाठी वारंवार तगादा लावू नये. जसे शासनाकडून अनुदान उपलब्ध होईल तसे देयके अदा करण्यात येतील. त्याबाबत झालेल्या विलंबामुळे कोणत्याही प्रकाराचे व्याज देय होणार नाही, याची नोंद घ्यावी.

१०. सदरील कामाचे कार्यालयीन आदेश हे कोणत्याही विभागाकडून तक्रार आल्यास आपणांस कोणतेही पुर्व सुचना न देता आदेश रद्द करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांना राहतील याची नोंद घ्यावी.

११. तसेच सदरील आदेश ई-निविदा/GeM प्रक्रिया होईपर्यंत किंवा पुढील आदेश निगर्मित होईपर्यंत मर्यादितच राहतील यांची नोंद घेण्यात यावी.

१२. कामा केल्यानंतर प्रलंबित देयकाबाबत तसेच अन्य कोणत्याही कारणास्तव कार्यालयीन आदेश रद्द केल्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा न्यायालयीन प्रकरण करता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

१३. तसेच आपल्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल नंबर हे त्या त्या विभागास देणे अत्यंत आवश्यक आहे.

१४. या रुग्णायातील विविध विभागातील काही अनुचित प्रकार घडल्यास, न्यायालय प्रकरण, पोलिस प्रकरण याबाबत सीसीटीव्ही फुटेज काढून देण्याकरिता आपला प्रतिनिधी पाठविणे बंधनकारक आहे.

१५. आपणांस सांगितलेले काम वेळेवर करुन देणे बंधनकारक राहील. कामाची टाळाटाळ केली तर आपणांस देण्यात आलेले कार्यालयीन आदेश रद्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

१६. सदरील उपरोक्त अटी व शर्ती संबंधीत पुरवठादार कंपनीस मान्य असल्याबाबतचे ५००/- रुपये शपथपत्र या कार्यालयास ०७ दिवसांच्या आत देणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

Sd/-
अधिष्ठाता,
श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर.

वरील नमुद केलेल्या अटी व शर्ती नियम वाचलेल्या असून त्या मला/आम्हांला मान्य आहेत.

निविदाधारकाची सही व शिक्का

तारीखः-